## प्रतिज्ञा पत्र

"श्री.उत्तम बंडू तुपे यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये (आंदण व कोंबारा या कथासंग्रहांच्या आधारे)" या विषयावरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल. (मराठी) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही, कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

अभ्यासक

(श्री.बा.कृ.पाटील)

स्थळ : कोल्हापूर
दिनांक : २८/१२/२०००

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री.बाजीराव कृष्णाजी पाटील यांनी "श्री.उत्तम बंडू तुपे यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये (आंदण व कोंबारा या कथासंग्रहांच्या आधारे)"या प्रबंधिकेचे संशोधन कार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

श्री.बाजीराव कृष्णाजी पाटील यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील, कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदर प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल.(मराठी) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यासाठी माझी अनुमती आहे. सदर प्रबंधिका मराठी ग्रामीण साहित्याच्या अभ्यासक्षेत्रात समाविष्ट होते.

मार्गदर्शक

(डॉ.विजय ह.निंबाळकर)

स्थळ : कोल्हापूर

दिनांक :२६/१२/२०००

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

## ऋणनिर्देश

साठोत्तर ग्रामीण साहित्य हे खेडयातील लोकांशी जवळीकता साधणारे आहे. तळागाळातल्या कष्टकरी समाजातील माणसांची दुःखे लोकांसमोर आणण्याचे महत्वाचे काम ग्रामीण साहित्याने केले. सामान्य माणसाचे जीवन, अंधश्रध्दा, रीतीरिवाज, दबलेल्या माणसाचे प्रत्ययकारी दर्शन घडविणारे हे लेखन आहे.

ग्रामीण भागातील माणसे, त्यांची जीवन जगण्याची पध्दती आणि एकंदरीत ग्रामीण जीवन माझ्या कुटुंबामध्ये असल्याने मला ग्रामीण विषयाची ओढ होती. माझे वडील सामाजिक कार्यात अग्रेसर असल्याने तसेच त्यांनी वयाच्या १६ व्या वर्षापासून पोलिस पाटील म्हणून काम केले. त्या संबंधातून त्यांच्याकडे आलेली माणसे माझ्याशी जवळीकता साधत गेली.

पुढे मी जेव्हा एम्.फिल्.(मराठी) पदवी परीक्षेसाठी प्रवेश घेतला तेव्हा माझ्या ग्रामीण जीवनाच्या आपुलकीची माहिती माझे गुरुवर्य डॉ. विजय निंबाळकर सरांना दिली. त्यांनीही समंती दिली. आणि मी ग्रामीण जीवनाचे कलात्मक विशेष आपणाला अभ्यासता येतील म्हणून हा विषय निवडला. श्री उत्तम बंडू तुपे यांनी ग्रामीण कथेला कोणते योगदान दिले याचा शोध घेण्याचा प्रयत्न मी या प्रबंधिकेमधून केलेला आहे.

प्रबंधिकेच्या लेखन कार्यासाठी अनेकांनी मला सहकार्य केले. त्यामध्ये उत्तम बंडू तुपे यांच्या कथांचा अभ्यास करण्याची दृष्टी आणि दिशा दिली ती डॉ.विजय निंबाळकर सरानीच. सरांच्या चिकित्सक मार्गदर्शनामुळे माझा विश्वास दुणावला. त्यांच्या स्नेहपूर्ण मार्गदर्शनामुळेच मी ही प्रबंधिका पूर्ण करू शकलो. असे हे आदरणीय मार्गदर्शक डॉ.विजय निंबाळकर यांचे ऋण शब्दांत व्यक्त न करता येण्यासारखे आहे. तसेच शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख डॉ.विश्वनाथ शिंदे, परुळेकर ग्रंथालय गारगोटीचे ग्रंथपाल दिंडेसर, बी.आय.पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

खडतर जीवनाशी सामना देत असताना माझ्या विषयीचे एक वेगळे स्वप्न ज्यांनी उराशी बाळगले, त्यांच्या या तपश्चर्येमुळेच त्यांचे हे स्वप्न या प्रबंधिकेद्वारे मी साकार करू शकलो ते माझे आई-दादा यांचा मी भक्तीभावाने उल्लेख करतो. त्यांनी मला कायमचे ऋणात ठेवले आहे.

मी सध्या कार्यरत असणाऱ्या राधानगरी महाविद्यालय, राधानगरीचे प्राचार्य श्री.बी.बी.चौगले सर्व माझे प्राध्यापक सहकारी मित्र व कर्मचारी या सर्वांचे मला सहकार्य लाभले हे विसरणे शक्य नाही.

तसेच माझे सहकारी मित्र प्रा.व्ही.डी.ढेरे, प्रा.के.डी.भाटले, प्रा.एकनाथ पाटील,प्रा.आनंद कांबळे, प्रा.विश्वास पाटील, प्रा.विनायक बरगे, प्रा.नितिन जरंडीकर, प्रा.पी.जी.चौगले या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच ग्रंथपाल के.एम.कुंभार, साताप्पा जोशी, चंद्रशेखर कांबळे यांचेही सहकार्य लाभले.

टंकलेखक मिलिंद भोसले (ऐश्वर्या कॉम्प्युटर अँड झेरॉक्स सेंटर,कोल्हापूर) यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आणि या प्रबंधिका लेखनाच्या आणि बांधणीच्या निमित्ताने अनेकांचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष सहाय्य झाले. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

अध्यासक

**श्री.बाजीराव कृष्णाजी पाटील**